
ePaper

# ‘हुकूमशाही सरकार घालवणार’, शरद पवार यांचा घणाघात!



‖ वर्ष - 7 । अंक - 333 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖

महाईन्यूज TM

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 22 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- हैदराबादचा पुन्हा धावांचा महापूर
- राजकुमार रावने प्लास्टिक सर्जरी केली
- टेस्लाची भारतातील गुंतवणूक लांबली
- माझ्यावर वेगवेगळे आरोप केले जातात


## अतिरिक्त आयुक्तांकडून शहरातील उद्यानांची पाहणी

# उद्यानावर लक्ष ठेवण्यासाठी ‘दक्ष’!

### प्रशासन नवे ॲप्लिकेशन : देखभाल, दुरुस्तीच्या कर्मचाऱ्यांना सूचना

**। पिंपरी। महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांचे जीवनमान सुधारून त्यांना उत्तम सोयी सुविधा देण्यासाठी महापालिकेच्या उद्यान विभाग प्रामुख्याने प्रयत्नशील आहे. शहरातील उद्यानांमध्ये नागरिकांना सर्व सुविधा देण्यासाठी महापालिका प्रशासन आघाडीवर असून त्यासाठी महापालिकेने पी सी एम सी दक्ष नावाचे ॲप्लिकेशन तयार केले आहे. सदर ॲप्लिकेशनच्या माध्यमातून उद्यानातील प्रत्येक कामावर लक्ष ठेवण्यात येत असून कर्मचाऱ्यांना ॲप्लिकेशनच्या माध्यमातून दैनंदिन कामाचे वाटप सुद्धा केले जात आहे. यामुळे संबंधित ठेकेदार यांच्याकडून काम पूर्ण न झाल्यास ठेकेदारास प्रतिदिन दंड सुद्धा आकारण्यात येत आहे.**



> **“** शहरातील उद्यानांमध्ये नागरिकांना उत्कृष्ट सेवा मिळाव्यात यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. पीसीएमसी दक्ष ॲप्लिकेशनच्या माध्यमातून उद्यानातील कामांवर लक्ष ठेवण्यात येणार असून कर्मचारी, ठेकेदार यांनी कामामध्ये हलगर्जीपणा करू नये.
>
> **- प्रदीप जांभळे पाटील,**
> **अतिरिक्त आयुक्त.**

याच अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी शहरातील विविध उद्यानास भेटी दिल्या. यामध्ये ड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत वाकड येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले उद्यान, पिंपळेनिलख येथील कै. प्रभाकर साठे उद्यान, शहीद अशोक कामठे उद्यान, या उद्यानांचा समावेश होता.

या पाहणीदरम्यान उपआयुक्त रविकिरण घोडके, सहाय्यक उद्यान अधिक्षक राजेश वसावे तसेच स्थापत्य आणि उद्यान विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी उद्यानांची पाहणी करून विविध दुरुस्तीबाबत सूचना दिल्या. अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी उद्यानांच्या मुख्य गेट समोरील साफसफाई करून गेट समोर पार्किंग करण्यासाठी प्रतिबंध घालावा, ओपन जिमच्या कडेने सुगंधित रोपांची व बांबूच्या झाडांच्या लागवड करावी, फुटपाथच्या बाजूने वडेलिया / पंपास ग्रास / कामिनी / डूराटा / माल्फेजिया वृक्षांची लागवड करावी, सीमा भिंतीलगत बांबूच्या झाडांची लागवड करावी तसेच उद्यानातील बॉक्समध्ये एकाच जातींच्या वृक्षांची लागवड करावी, उद्यानामध्ये साफसफाई ठेऊन नागरिकांना अडथळा होणार नाही किंवा अडचणी येणार नाही अशा पद्धतीने उद्यानांची देखभाल दुरुस्ती करावी इ. सुचना दिल्या.

# मावळ, शिरूरमध्ये आता तिरंगी लढत!

### लोकसभा निवडणूक : ‘वंचित’कडून माधवी जोशी, आफताब अन्वर यांना उमेदवारी

**। पिंपरी । महाईन्यूज ।**

मावळ आणि शिरूर लोकसभा मतदारसंघात तिरंगी लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. वंचित बहुजन आघाडीने मावळमधून माधवी जोशी यांना तर शिरूरमधून आफताब अन्वर मकबूल शेख यांना शनिवारी (२० एप्रिल) उमेदवारी जाहीर केली आहे.



मावळ, शिरूर लोकसभा मतदारसंघाठी गुरुवारपासून उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ झाला आहे. परंतु, वंचितने अद्याप उमेदवार जाहीर केला नव्हता. कर्जत येथील माधवी जोशी या शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होत्या. परंतु, महाविकास आघाडीत मावळची जागा ठाकरे गटाला सुटली. त्यामुळे जोशी यांनी शनिवारी वंचितमध्ये प्रवेश करत उमेदवारी मिळविली. महायुतीकडून खासदार श्रीरंग बारणे, महाविकास आघाडीकडून माजी महापौर संजोग वाघेरे आणि वंचितच्या माधवी जोशी यांच्या उमेदवारीमुळे तिरंगी लढत होणार आहे. शिरूर लोकसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीने पुणे जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती मंगलदास बांदल यांना उमेदवारी जाहीर केली होती. परंतु, उमेदवारी जाहीर झाल्यानंतर भाजप नेते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणे आणि बारामतीत पक्ष विरोधी भूमिका घेतल्याने बांदल यांची उमेदवारी रद्द करण्यात आली होती. आता आफताब अन्वर मकबूल शेख यांना वंचित बहुजन आघाडीने उमेदवारी जाहीर केली आहे.

#### महाविकास आघाडीला फटका?

» दरम्यान, महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी थेट झाल्यास महाविकास आघाडीला फायदा होण्याची शक्यता जास्त असते. कारण, भाजपाविरोधी मते आणि अल्पसंख्याक मतदार महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मतदान करतो, असे निरीक्षण आहे. आता मावळ आणि शिरुरमध्ये वंचित बहुजन आघाडीने उमेदवार दिल्यामुळे महाविकास आघाडीच्या मतांचे विभाजन होईल, असा दावा केला जात आहे.

# ‘रिंग रोड’साठी आंतरराष्ट्रीय निविदा!

## वाहतूक कोंडीतून होणार सुटका : 136 किलोमीटर रिंगरोडला ‘गती’

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुणे, पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी साकारण्यात येणाऱ्या सुमारे १३६.८० किलोमीटर लांबीच्या चक्राकार मार्गासाठी (रिंग रोड) देशासह परदेशातील सुमारे १२ कंपन्यांनी निविदा सादर केल्या आहेत. त्या सर्व कंपन्यांनी सादर केलेल्या निविदांची तांत्रिक छाननीची प्रक्रिया राज्य रस्ते विकास महामंडळाने सुरू केली**






असून, ती पूर्ण होण्यासाठी आणखी १५ दिवसांचा कालावधी लागणार आहे. रिंग रोड पूर्व आणि पश्चिम टप्प्यात होणार असून, त्यासाठी आतापर्यंत सुमारे ७० टक्के जमीन संपादित झाली आहे. प्रकल्पासाठी सुमारे २८ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. पुरंदर, भोर, हवेली, खेड, मावळ तालुक्यांत हा रिंग रोड जात आहे. रिंग रोड नऊ पॅकेजमध्ये साकारण्यात येणार आहे. त्या दृष्टीने रस्ते विकास महामंडळाने निविदा जाहीर केल्या आहेत. देशासह परदेशातील विविध बांधकाम क्षेत्रातील कंपन्यांनी निविदा सादर केल्या आहेत. या कामासाठी यापूर्वीच कंपन्यांची पात्रता निश्चित करण्यात आली होती. २८ कंपन्यांनी अर्ज केले होते. त्यापैकी सुमारे १९ कंपन्या पात्र ठरल्या होत्या. त्याच कंपन्यांनी नऊ पॅकेजससाठी निविदा सादर केल्या आहेत. रिंग रोडसाठी निविदा सादर केलेल्या कंपन्यांच्या निविदांची तांत्रिक छाननीची प्रक्रिया झाल्यानंतर कंपन्यांच्या निविदांची आर्थिक छाननी केली जाईल. जूनमध्ये आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर त्याबाबतचा अंतिम प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविला जाईल. त्यानंतर पात्र कंपन्यांना कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर) देण्यात येतील. रस्ते विकास महामंडळाकडून एकाच वेळी पूर्व आणि पश्चिम टप्प्यातील रिंग रोडचे काम वेगाने सुरू व्हावे, यासाठी पॅकेज किंवा टप्पे निश्चित करण्यात आले आहेत. त्यासाठी विविध कंपन्यांनी निविदा दाखल केल्या आहेत. पूर्व भागातील रिंग रोडसाठी चार टप्पे निश्चित करण्यात आले आहेत. पश्चिम भागातील रिंग रोड पाच टप्प्यांत केला जाणार आहे.

### निविदा कोणाच्या?

- निविदा दाखल केलेल्यांमध्ये सुमारे १२ कंपन्यांचा समावेश.
- कंपन्यांनी विविध ठिकाणच्या पॅकेजसाठी निविदा सादर केल्या.
- मेघा इंजिनीअरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर लि., ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर, गवार कन्स्ट्रक्शन, एच. जी. इन्फ्रा इंजिनीअरिंग, एल अँड टी, नवयुगा इंजिनीअरिंग कंपनीसारख्या देशासह परदेशातील बड्या कंपन्यांचा समावेश यात आहे. - मेघा, नवयुगा; तसेच ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने सर्वाधिक कामांसाठी निविदा दाखल केल्या आहेत.

# वाघोलीत आढळराव पाटलांचे जंगी स्वागत!

## लोकसभा निवडणूकः महायुतीच्या प्रचाराला उत्स्फूर्त प्रतिसाद

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुक प्रक्रियेला सुरूवात झाली असून जसजशी मतदानाची तारीख जवळ येत आहे तसतसा प्रचाराला देखील वेग लागला आहे. उमेदवारांकडून प्रत्यक्ष गाठीभेठी आणि पदयात्रेवर भर दिला जात आहे. शिरूर लोकसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार शिवाजीराव अढळराव पाटील यांनी हडपसर विधानसभा मतदार संघाचा दौरा केल्यानंतर आज वाघोली – शिरूर विधानसभा मतदार संघातील वाघोली परिसरात दौरा केला.**



वाघोलीतील वाघेश्वर स्पोर्ट्स क्लब येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून त्यांनी आजच्या दौऱ्याची सुरुवात केली. त्यानंतर ड्रीम संकल्प सोसायटी येथे जावून स्थानिकांशी संवाद साधत, समस्त माता-भगिनींकडून व ज्येष्ठांकडून महायुतीच्या विजयासाठी आशिर्वाद घेतले.ऑक्सीव्हॅली-२, नियती वेलान सोसायटी येथील रहिवाश्यांची भेट घेतली. स्थानिकांशी संवाद साधत असता, येथील पाण्याची समस्या, ड्रेनेजची समस्या व इतर समस्यांवर चर्चा करत, त्यांचे निवारण करण्याचे आश्वासन देखील अढळराव पाटलांनी त्यांना दिले. यावेळी पुणे जिल्हापरिषद माजी अध्यक्ष प्रदिप कंद, स्वीकृत नगरसेवक शांताराम बापू कटके, भाजपा हवेली तालुकाध्यक्ष श्याम गावडे, उपाध्यक्ष पुणे जिल्हा राष्ट्रवादी उमेश उंद्रे, उपाध्यक्ष भाजपा पुणे दादासाहेब सातव, युवा जिल्हा प्रमुख पुणे गणेश सातव पाटील, भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संदिप सातव, युवा सेना शहर प्रमुख वाघोली यश सातव, युवा सेना मंगेश सातव, भाजपा किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष दादासाहेब सातव, पुणे जिल्हा महिला मोर्चा सरचिटणीस योगिता सातव, सोशल मीडिया अध्यक्ष अश्विनी पांडे, जिल्हा सचिव भाजप मोहन शिंदे, महिला मोर्चा वाघोली अध्यक्ष विद्या पाटील आदी उपस्थित होते.

### महायुतीला विजयी करण्याचा निर्धार...

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारानिमित्त केसनंद फाटा येथे जावून वाघोलीचे उपसरपंच मारुती भगवंत गाडे यांच्या निवासस्थानी त्यांची भेट घेतली. यावेळी बीजेएस महाविद्यालयासमोर राष्ट्रवादी आणि महायुतीच्या कार्यकर्त्यांनी पुष्पवृष्टी करत शिवाजीराव अढळराव पाटील यांचे उत्साहात स्वागत केले. यावेळी कार्यअहवाल वाटपादरम्यान, "घड्याळ तेच, वेळ नवी" अशी घोषणा करत उपस्थित समस्त पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांना प्रचंड बहूमातांनी, महायुतीला विजयी करण्याचा निर्धार केला.

# अवकाळी पावसाचा फळभाज्यांना फटका

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।



उन्हाचा तडाखा, तसेच अवकाळी पावसामुळे घाऊक बाजारात फळभाज्यांची आवक गेल्या आठवड्याच्या तुलनेत कमी झाली आहे. हिरवी मिरची, घेवडा, मटारच्या दरात दहा टक्क्यांनी वाढ झाली आहे. भुईमुग शेंगांची आवक वाढल्याने दरात घट झाली असून, अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी (२१ एप्रिल) राज्य, तसेच परराज्यातून मिळून ८० ते ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून ८ ते १० टेम्पो हिरवी मिरची, गुजरात, आंध्र प्रदेश, कर्नाटकातून प्रत्येकी ३ टेम्पो तोतापुरी कैरी, गुजरात, कर्नाटकातून मिळून ३ ते ४ टेम्पो कोबी, २ ते ४ टेम्पो घेवडा, पावटा २ ते ३ टेम्पो, भुईमूग शेंग ३ टेम्पो, आंध्र प्रदेश, तामिळनाडूतून ७ टेम्पो शेवगा, राजस्थानातून १ ट्रक गाजर, हिमाचल प्रदेशातून ६ ट्रक मटार, मध्य प्रदेशातून १० टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली. पुणे विभागातून सातारी आले ५०० ते ६०० गोणी, भेंडी ५ ते ६ टेम्पो, गवार ५ ते ६ टेम्पो, टोमॅटो ७ हजार पेटी, हिरवी मिरची २ ते ३ टेम्पो, ढोबळी मिरची ८ ते १० टेम्पो, कोबी ५ टेम्पो, फ्लॉवर १० ते १२ टेम्पो, ढोबळी मिरची ८ ते १० टेम्पो, काकडी ७ ते ८ टेम्पो, पारनेर भागातून २ टेम्पो मटार, भुईमुग शेंग २५ ते ३० गोणी, तांबडा भोपळा ८ ते १० टेम्पो, १०० ट्रक तसेच इंदूर, आग्रा आणि स्थानिक भागातून ३० ट्रक बटाटा अशी आवक झाली. बाजारातील पालेभाज्यांचे दर स्थिर आहेत. मार्केटयार्डातील तरकारी विभागात रविवारी कोथिंबीर दीड लाख जुडी, मेथीच्या ७० हजार जुडी अशी आवक झाली. किरकोळ बाजारात एक जुडी मेथी, कोथिंबिरेचे दर २० ते २५ रुपये असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

# ‘एक्सप्रेस वे’ आता स्पीडगनच्या निशाण्यावर!

## वेगमर्यादा निश्चित : दंडात्मक कारवाई करणार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अपघात रोखण्यासाठी आणि वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी महामार्ग पोलिसांकडून पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर वेगमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. यात कारला समतल भागात १००, तर घाट परिसरात ६० वेगमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. ही वेगमर्यादा पूर्वीपेक्षा अधिक असल्याने वाहने आता वेगाने धावणार आहेत. या मर्यादेचे उल्लंघन केल्यास वाहनचालकांवर सीसीटीव्ही आणि स्पीडगनच्या माध्यमातून दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.**





पुणे-मुंबई-पुणे अंतर कमी करण्यासाठी या एक्स्प्रेस वेची म्हणजेच यशवंतराव चव्हाण दुतगती मार्गाची निर्मिती करण्यात आली. मात्र, या मार्गावर गेल्या काही वर्षांपासून ठोस पावले उचलली जात आहेत. त्यामुळे मागील वर्षात महामार्गावरील अपघात घटल्याचे समोर आले. यात आणखी घट होऊन एक्स्प्रेसवेवरील अपघात शून्य करण्यासाठी महामार्ग पोलिसांकडून वेगमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. यासंदर्भातील आदेश अपर पोलिस महासंचालक (वाहतूक) सुखविंदर सिंगा यांनी दिले. त्यानुसार आता पुणे-मुंबई पुणे एक्स्प्रेस वेवर वेग मर्यादेची कडक अंमलबजावणी केली जाणार आहे.

पुणे-मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे हा एकूण ९४ किलोमीटरचा असून, या महामार्गावर ३५ ते ५२ किमी या टप्प्यामध्ये घाटभाग म्हणजेच बोर घाट आहे. सद्यःस्थितीत या दुतगती महामार्गावरील समतल भागासाठी असलेली वेगमर्यादा १०० किलोमीटर प्रतितास असून, घाटभागामध्ये आल्यानंतर वेगमर्यादा ६० किलोमीटर प्रतितास आहे. मात्र, घाटभागातील ही वेगमर्यादा हलक्या वाहनांसाठी अत्यंत कमी असून, पुणे ते मुंबई वाहिनीवर अतितीव्र उतार आहे.

### ... अशी आहे वेगमर्यादा !

» समतल भागातून १०० किलोमीटर प्रतितास याप्रमाणे प्रवास केल्यानंतर घाटभागात आल्यावर वाहनाची वेगमर्यादा ६० किलोमीटरवर आणताना वाहनचालकांना अडचणी निर्माण होतात. तसेच, त्यादरम्यान वाहनचालकाने वाहनांचा वेग जलदगतीने कमी केल्याने अनेक अपघात घडल्याचे समोर आले आहे. त्यामुळे वाहनांच्या वर्गानुरूप वेगमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

---

# संजोग वाघेरे यांच्या “मॉर्निंग वॉक पे चर्चा”

## » निवडणूक रणसंग्राम: मावळातून विजयी करण्याचे आवाहन

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मावळ लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी आज, रविवारी सकाळी पिंपळे सौदागर लिनियर गार्डन येथे मॉर्निंग वॉक करत अभिनव पद्धतीने मतदारांशी संवाद साधला. यावेळी नागरिकांनी मोकळेपणाने वाघेरे पाटील यांच्यासोबत अनेक समस्यांवर देखील चर्चा केली.**



संजोग वाघेरे पाटील यांनी रविवारी सकाळी लिनियर गार्डन येथे जॉगिंग पार्कला भेट दिली. यावेळी दररोज या ठिकाणी मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या ज्येष्ठ नागरिक, महिला आणि युवकांसोबत संवाद साधला.

यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पदाधिकारी, तसेच हास्य क्लब आणि योगा ग्रूपचे सदस्य आवर्जून उपस्थित होते. वाघेरे पाटलांनी यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. पिंपरी चिंचवड शहरातील लोकांच्या समस्यांवरही चर्चा केली.

मावळ लोकसभा मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि मशाल चिन्ह लक्षात ठेवा. आपल्या समस्या सोडविण्यासाठी या लोकसभा निवडणुकीत तुमचा आशीर्वाद द्या, असे आवाहन त्यांनी यावेळी उपस्थित सर्वांना केले. खासदार म्हणून देखील आपल्यासोबत वेळोवेळी संवाद साधण्यासाठी मी उपलब्ध असेल, असा विश्वास देखील वाघेरे पाटील यांनी ज्येष्ठ नागरिकांसह सर्वांना दिला.

> “ शहरात अनेक उद्यानांमध्ये नागरिक सकाळी, तसेच संध्याकाळी व्यायामासाठी येतात. त्यांच्यासाठी ओपन जीमचे साहित्य महापालिकेच्या माध्यमातून बसविण्यात येते. परंतु, जीमच्या साहित्याची संख्या कमी असल्यामुळे व साहित्याची दुरावस्था होते. ज्येष्ठ नागरिकांना त्याचा वापर करता येत नाही. यासह वाढणारी वाहतूक कोंडी, पादचारी मार्गाची गरज अशा अनेक बाबी उपस्थित नागरिकांनी माझ्यासमोर मांडल्या. देशातील स्थिती आणि राजकारणावर आपली मते व्यक्त केली. ज्येष्ठ नागरिक हे समाजाचे महत्त्वाचे घटक आहेत. त्यांची काळजी किंवा त्यांना मिळणाऱ्या सुविधा याकडे देखील आपण लक्ष देवू, याबाबत त्यांना आश्वस्त केले. तसेच ज्येष्ठ नागरिक, महिला आणि युवक सर्वांनीच बदल घडविण्याचा निश्चय केला आहे. हे त्यांच्याशी संवाद साधल्यानंतर दिसत असून येत्या ४ जून रोजी हेच आपल्याला पाहायला मिळेल.
>
> **-संजोग वाघेरे पाटील,**
>
> **उमेदवार, मावळ लोकसभा मतदारसंघ, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे).**

---

## किवळे येथेही मेट्रोची सुविधा : खासदार बारणे

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोट्यवधी गोरगरिबांना अन्नधान्य तर शेतकरी व महिलांना सन्मान दिला. मोदींनी रक्ताचा थेंबही न सांडवता जम्मू-काश्मीरमध्ये शांतता प्रस्थापित केली. जगामध्ये भारताचे मान उंचावली. त्यामुळे त्यांना पुन्हा पंतप्रधान करणे, हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे, असे मत मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना भाजप राष्ट्रवादी मनसे आरपीआय रासप महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी व्यक्त केले. देहूरोड किवळे इथे आयोजित करण्यात आलेल्या नमो संवाद सभेत ते बोलत होते. व्यासपीठावर माजी नगरसेवक बाळासाहेब ओव्हाळ, शिवसेना शहर प्रमुख निलेश तरस, जिल्हा संघटिका शैलाताई पाचपुते तसेच शीलाताई भोंडवे, नानासाहेब डोईफोडे, सुदाम दिवटे, गौतम गायकवाड, प्रकाश साबळे, रवींद्र कदम, मीनाताई डेरे, सुनीता संदणे, निशाताई ओव्हाळ, मनोज थोरवे, सुरेश नायर, विनोद चांदमारे व परिसरातील महिला बचत गटांच्या सदस्या व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# ग्रंथ परिचयाच्या विश्वात..



भूमिका

**‘न्यू यॉर्क टाइम्स’चे पाळण्यातले नाव ‘न्यू यॉर्क डेली टाइम्स’ असे होते. अमेरिकन यादवी युद्धाच्या १० वर्षे आधी म्हणजे, १८५१ साली त्याचा जन्म झाला. त्याच्या जन्मदात्यांची त्यामागची भूमिका अशी होती की समाजात पूर्णपणे चांगले अथवा पूर्णपणे टाकाऊ असे काही नसते. “जे चांगले आहे ते जपू आणि त्यात सुधारणा करत राहू तसेच जे वाईट आहे ते नष्ट करू वा बदलू.’**

’ या भूमिकेला अनुसरून प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांबद्दल माहिती देणे पत्राच्या पहिल्या आवृत्तीपासून सुरू झाले. माहिती देतानाही समाजाला आरसा दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्यांनी म्हटले, “साहित्यातून प्रगट होणाऱ्या समाजातल्या रीतीभाती, नीतीच्या समजुती वाचकांना दाखवण्याचा आमचा प्रयत्न राहील. कधी कधी त्यावर टीकाही केली जाईल, पण ती नम्रतापूर्वक असेल, अर्थात अधेमधे यात चुकाही होण्याचा संभव आहे.”न्यू यॉर्क टाइम्स’ प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांची नोंद आणि त्यांच्या जाहिराती देणे, यावरच थांबून राहिले नाही. पुस्तकांबद्दल लिहिणे, साहित्यविषयक विविध लेखकांचे निबंध आणि मुलाखती, तसेच वाचकांची पत्रे प्रकाशित करणे हेही सुरू राहिले. १८९६ पासून दर शनिवारी ‘न्यू यॉर्क टाइम्स बुक रिव्ह्यू’ या नावाने स्वतंत्र पुरवणी देणे सुरू केले. त्यात राजकारण, संगीत, क्रीडा अशा विविध प्रकारच्या



जीवनप्रवाहात अग्रणी असणाऱ्या माणसांनी पुस्तकांवर लिहिले. ‘न्यू यॉर्क टाइम्स बुक रिव्ह्यू १२५ इयर्स ऑफ लिटररी हिस्टरी – १८९६ टू २०२१’ या अत्यंत देखण्या पुस्तकात १२५ वर्षांतील मोजकी पुस्तक परीक्षणे, निबंध, मुलाखती, वाचकांची पत्रे व तसेच काही छायाचित्रे एकत्र करण्यात आली आहेत. पुस्तक परीक्षणे लिहिणाऱ्या लेखकांची नावे पाहिली तरी या ग्रंथाच्या श्रीमंतीची आपल्याला कल्पना यावी. जेम्स बाल्डविन, मार्गारेट ॲटवुड, व्हर्जिनिया वूल्फ हे साहित्यिक, अमेरिकन राष्ट्राध्यक्षांना ज्याच्यामुळे राजीनामा द्यावा लागला तो पत्रकार कार्ल ब्रेस्ताईन या दर्जाची मंडळी त्यात आहेत. तर सत्तेची नशा उलगडून सांगणारा चरित्रकार रॉबर्ट कारो लिखित लिंडन जॉनसनच्या चरित्राच्या एका खंडाचे परीक्षण बिल क्लिंटन यांनी केले आहे. हर्बर्ट हुव्हर आणि जॉन एफ. केनडी यांनीही यात पुस्तकांवर लिहिले आहे.कार्सन माक्युलार्स हिची, ‘द हार्ट इझ अ लोन्ली हंटर’ ही कादंबरी आली तेव्हा ती फक्त २२ वर्षांची होती. अमेरिकेच्या एका गावातल्या दोन मुक्या व बहिऱ्या व्यक्तींमधील मैत्रीची ही कथा आपल्याला गुंतवून ठेवते. गावात एकमेकांना धरून राहणारी माणसेही किती एकटी असतात ते कादंबरीत अनुभवता यते. सूक्ष्म मनोव्यापार मांडण्याच्या तिच्या कौशल्याची चुणूक पुढील संवादात दिसते. “भांडण्यासाठी शब्दांची गरज नसते, आता आपण शांतपणे शेजारी बसलो असतानादेखील मी तुमच्याशी नेहमी सारखाच वाद घालत असते.. तेव्हा आपण कुठल्याच प्रकारे न भांडण्याचा प्रयत्न करू.” एवढ्या लहान वयात या लेखिकेने या कादंबरीत एवढी उंची गाठली आहे, की तिला पुढे तिथवर जाता येणेही अवघड आहे, हे १९४० साली परीक्षणात व्यक्त केलेले मत नंतर तिने खोटे ठरवले. सर्वसामान्य वाचकाला लेखकाबद्दल कुतूहल असते हे ओळखून ‘टाइम्स’ने लेखक आणि त्याच्या घराबद्दल माहिती देणारे सदर १८९७ च्या अखेरीस सुरू केले. छायाचित्रांचा प्रसार अजून पुरेसा झाला नव्हता. लेखक दिसतो कसा याचेही कुतूहल असे. या प्रकारचे २२ लेख गोळा करून ‘अमेरिकन ऑथर्स अँण्ड देअर होम्स’ असे पुस्तक काढले. त्यात मार्क ट्वेन्च्या संबंधात लिहिले, ‘तो त्याचे बरेचसे लिहिण्याचे काम अंथरुणातून करतो.’ त्याने नवोदित लेखकांना सल्ला दिला आहे , ‘लिहिणे ही सर्वात सोपी गोष्ट आहे. कधीतरी अंथरुणातून ते जमते का ते पाहा. मी जागा झालो की तोंडात पाइप ठेवतो. मांडीवर लाकडी बोर्ड घेतो आणि लिहितो. विचार करणे सर्वात सोपी गोष्ट आहे आणि त्यानुसार बोटे हलवण्यात काही फार कष्ट नाहीत.” शोधपत्रकारितेतून जन्माला आलेले ‘अँण्ड द बॅण्ड प्लेड ऑन’ हे एड्सविषयीचे गाजलेले पुस्तक अमेरिकेने या भयावह साथीकडे कसे दुर्लक्ष केले, हे सांगते. याचा लेखक रँडी शिल्ट्स या गे पत्रकाराच्या मुलाखतीचा गोषवारा बुक रिव्ह्यू केवळ २०० शब्दांत यात दिला आहे. तो म्हणतो, “खरेतर कुठल्याही पत्रकाराने हे काम करायला हवे होते. मी केले कारण ज्यांच्याबद्दल मला आस्था व प्रेम होते त्यांच्यामध्ये एड्स पसरत होता आणि ते सारे मरण भोगत होते.

## संपादकीय »

### उद्याचा मंत्री?

***भारतात माध्यमस्वातंत्र्य आणि लोकशाही संकोच होत असल्याचे आढळले.***

जगातील अनेक महत्त्वाच्या आणि निर्भीड वृत्तपत्रांप्रमाणे आयर्लंडमधील ‘द आयरिश टाइम्स’ या वर्तमानपत्रासही भारतात माध्यमस्वातंत्र्य आणि लोकशाही संकोच होत असल्याचे आढळले. या वर्तमानपत्राने आपल्या संपादकीयात भारतातील सरकारी वरवंट्याचा दाखला दिला आणि ‘आप’चे अरविंद केजरीवाल यांच्या तुरुंगवासाचा उल्लेख केला. भारतात काँग्रेसच्या मुस्कटदाबीचे कसे प्रयत्न झाले ही बाबदेखील हे वर्तमानपत्र नमूद करते. ‘मोदींची पकड घट्ट’ अशा शीर्षकाच्या या संपादकीयात भारतातील राजकीय परिस्थितीवर विविध अंगाने भाष्य आहे. आपल्याकडे निवडणुका सुरू आहेत. यानिमित्ताने ‘लोकशाहीची जननी’ इत्यादी असलेल्या आपल्या देशात अन्य देशीय अनेक माध्यमांस रस निर्माण होणे साहजिक.निवडणुकांचे वार्तांकन हा एक हेतू. आणित्या त्या देशात इतके भारतीय असतात की आपल्या वाचकांस त्यांच्या मायदेशातील घडामोडींची माहिती देणे हेदेखील माध्यमांचे कर्तव्य असते.

बिगर भाजपशासित राज्यांमधील राज्यपाल त्यांची कार्यपद्धती, विधानसभेने मंजूर केलेली विधेयके रखडवून ठेवणे, लोकनियुक्त सरकारची अडवणूक करणे, विद्यापीठांच्या कुलगुरूंची निवड यातून सततच वादग्रस्त ठरत आहेत.

## राज्यपालांना ‘अपवादात्मक’ सल्ला

न्यायपालिकेने राज्यपालांना त्यांच्या घटनात्मक कर्तव्याची जाणीव करून दिल्यावर किंवा सर्वोच्च न्यायालयाने कानउघाडणी केल्यावरही राज्यपालांच्या कार्यपद्धतीत बदल होत नाही, हे दुर्दैवच. पश्चिम बंगाल, केरळ, तमिळनाडू, पंजाब, दिल्ली आदी बिगर भाजपशासित राज्यांमधील राज्यपाल किंवा नायब राज्यपालांना आपण घटनात्मक प्रमुख असलो तरी सरकारच्या सल्ल्यानुसार काम करायचे असते या घटनेतील तरतुदीचा बहुधा विसर पडलेला दिसतो. आतापर्यंत सर्वोच्च न्यायालयाने कर्तव्याचे पालन न करणाऱ्या राज्यपालांची कानउघाडणी केली, पण पश्चिम बंगालचे राज्यपाल सी. व्ही. आनंद बोस यांना निवडणूक आयोग या घटनात्मक यंत्रणेने दिलेला ‘प्रेमळ सल्ला’ हा अपवादात्मक मानला जातो.देशातील १०२ लोकसभा मतदारसंघांमध्ये शुक्रवारी मतदान होत आहे व त्यात पश्चिम बंगालमधील तीन मतदारसंघांचा समावेश आहे. प्रचार संपल्यापासून मतदान प्रक्रिया पार



पडेपर्यंतचा ४८ तासांचा कालावधी हा शांततेचा कालावधी (सायलन्स पीरियड) म्हणून ओळखला जातो. या काळात मतदारांवर प्रभाव पडेल अशी कोणतीही कृती करता येत नाही. फक्त राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांना घरोघरी जाऊन संपर्क साधता येतो. या कालावधीत पश्चिम बंगालचे राज्यपाल आनंद बोस यांनी मतदान होत असलेल्या तीनपैकी एका, कूचबिहार मतदारसंघात गुरुवार आणिकारण काहीच देण्यात आले नाही. राज्यपाल कायदा आणि सुव्यवस्थेचा आढावा घेणार होते एवढीच माहिती राजभवनकडून देण्यात आली. निवडणूक आयोग सत्ताधाऱ्यांना झुकते माप देतो, असा आरोप राहुल गांधींपासून ममता बॅनर्जीपर्यंत अनेक विरोधी नेते करीत असताना मतदानाचा दिवस असल्याने राज्यपालांनी कूचबिहारचा दौरा रद्द करावा, असा सल्ला निवडणूक आयोगाने राज्यपालांना दिला. असा सल्ला देणे तसे अपवादात्मकच. सर्वोच्च न्यायालय राज्यपालांना निर्देश देऊ शकत नाही. कारण घटनेच्या ३६१ व्या कलमानुसार, राष्ट्रपती किंवा राज्यपाल कोणत्याही न्यायालयीन प्रक्रियेला उत्तरदायी नसतात. पण सध्याच्या स्थितीत निवडणूक आयोगाने राज्यपालांना दौरा रद्द करण्याचा सल्ला देण्याचे एक प्रकारे धाडसच दाखविणे, हे अभिनंदनास प्राप्त ठरते. वास्तविक निवडणूक प्रक्रियेशी राज्यपालांचा थेट संबंध नसतो. समजा मतदान होत असलेल्या मतदारसंघातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडली, तर त्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे. कूचबिहार मतदारसंघातून भाजपच्या वतीने केंद्रीय गृहराज्यमंत्री निशित प्रमाणिक हे निवडणूक लढवीत आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# खासदार झालो तरी फेटा बांधणार नाही!

## मशिदींमधून काँग्रेसला मतदान करण्यासाठी फतवे

। नगर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सोलापूर लोकसभा निवडणुकीत भाजपच्या विरोधात मतविभागणी टाळण्यासाठी एमआयएम पक्षाने उमेदवार उभा केला नाही. या पार्श्वभूमीवर भाष्य करताना भाजपचे उमेदवार राम सातपुते यांनी हिंदुत्वाचा सूर आळवत मशिदींतून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना हरविण्यासाठी काँग्रेसच्या बाजूने मतदान करण्याचे फतवे निघत असल्याचा आरोप केला. तर शहर काझी मुफ्ती अहमदआली काझी यांनी सातपुते यांचा हा आरोप स्पष्ट शब्दात फेटाळला आहे.**



मागील २०१९ सालच्या सोलापूर लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी एमआयएमबरोबर आघाडी करून एक लाख ७० हजार मते घेतली होती. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांना मतविभागणीचा मोठा फटका बसून पराभव पत्करावा लागला होता. या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांच्या दबावामुळे एमआयएमने उमेदवार उभा केला नाही. दरम्यान, मशिदींमधूनही मतदानाचे पवित्र कर्तव्य बजावण्याच्या दृष्टीने प्रबोधन केले जात आहे.यासंदर्भात बोलताना भाजपचे राम सातपुते यांनी मशिदींतून काँग्रेसला मतदान करण्याच्या सूचना दिल्या जात असल्याचा आरोप केला आहे. मशिदींमधून एखाद्या पक्षाला मतदान करण्यास सांगणे हा राज्य घटनेचा अवमान असल्याचाही आरोप त्यांनी केला आहे. या मुद्यावर हिंदू मतदारांनी बोध घेऊन एकत्र यावे आणि भाजपला मतदान करावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.मराठा आरक्षण प्रश्नावर मराठा समाजाचा भाजपच्या विरोधात रोष वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर राम सातपुते यांनी मराठा आरक्षणाच्या बाजूने भूमिका मांडली. एवढेच नव्हे तर जोपर्यंत मराठा आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत खासदार झालो तरी डोक्याला फेटा बांधून घेणार नाही, असे त्यांनी जाहीर केले.लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढण्यासाठी शासनस्तरावर कार्यक्रम राबविले जातात. मतदारांनी मतदानाचा पवित्र हक्क बजावण्यासाठी सार्वत्रिक प्रबोधन होणे अपेक्षित आहे. याच प्रामाणिक भूमिकेतून मशिदींमधून मतदानासाठी आवाहन केले जात असेल तर त्यात चूक नाही. मतदानासाठी फतवे काढले जात नाहीत. परंतु याउलट मुस्लीम समाजाविषयी तद्दन खोटा प्रचार करून आणि धार्मिक तेढ निर्माण करण्याचा, पर्यायाने धार्मिक ध्रुवीकरणाचा प्रयत्न होत आहे. त्यास कोणीही बळी पडू नये. मागील २०१९ सालच्या सोलापूर लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी एमआयएमबरोबर आघाडी करून एक लाख ७० हजार मते घेतली होती. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांना मतविभागणीचा मोठा फटका बसून पराभव पत्करावा लागला होता. या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांच्या दबावामुळे एमआयएमने उमेदवार उभा केला नाही. मतदान करण्यास सांगणे हा राज्य घटनेचा अवमान असल्याचाही आरोप त्यांनी केला आहे. या मुद्यावर हिंदू मतदारांनी बोध घेऊन एकत्र यावे आणि भाजपला मतदान करावे.

### आरक्षणाच्या बाजूने भूमिका मांडली

» मागील २०१९ सालच्या सोलापूर लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी एमआयएमबरोबर आघाडी करून एक लाख ७० हजार मते घेतली होती. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांना मतविभागणीचा मोठा फटका बसून पराभव पत्करावा लागला होता. या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांच्या दबावामुळे एमआयएमने उमेदवार उभा केला नाही. दरम्यान, मशिदींमधूनही मतदानाचे पवित्र कर्तव्य बजावण्याच्या दृष्टीने प्रबोधन केले जात आहे.यासंदर्भात बोलताना भाजपचे राम सातपुते यांनी मशिदींतून काँग्रेसला मतदान करण्याच्या सूचना दिल्या जात असल्याचा आरोप केला आहे. मशिदींमधून एखाद्या पक्षाला मतदान करण्यास सांगणे हा राज्य घटनेचा अवमान असल्याचाही आरोप त्यांनी केला आहे. या मुद्यावर हिंदू मतदारांनी बोध घेऊन एकत्र यावे आणि भाजपला मतदान करावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.मराठा आरक्षण प्रश्नावर मराठा समाजाचा भाजपच्या विरोधात रोष वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर राम सातपुते यांनी मराठा आरक्षणाच्या बाजूने भूमिका मांडली.

---

# मोदी सरकारमुळे भारतीयांचा अपेक्षाभंग!

## खासदार अमोल कोल्हे : जुलमी सत्ता बदलण्यासाठी युवकांची साथ हवी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशातील जनतेचा मोदी सरकारने अपेक्षाभंग केला आहे विशेष करून युवकांना बेरोजगार करण्याचे पाप या सरकारने केलं आहे. जगाचा इतिहास बघितला तर क्रांती तेव्हा घडते जेव्हा युवक मनावर घेतो.देशातील वातावरण बदललेलं आहे केंद्रातील मोदी सरकार यावेळेस जाणार आहे ही काळ्या दगडावरची रेष आहे.**




ही निवडणूक युवकांच्या अस्तित्वाची आहे. तरुणांनी प्रवाहात असणे गरजेचे आहे.

युवकांनी काठावर बसून फक्त टाळ्या वाजवले तर परिवर्तनाचे साक्षीदार होतील परंतु समोर येऊन या लढ्यात सामील झाले तर या परिवर्तनाचे शिलेदार होतील, असा विश्वास खासदार अमोल कोल्हे यांनी व्यक्त केला.शिरूर लोकसभेतील राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार, युवासेना, युवक काँग्रेस, आम आदमी पार्टीच्या पदाधिकाऱ्यांचा संयुक्त "युवा महाराष्ट्राभिमान मेळावा" भोसरी येथील कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृह येथे पार पडला. यावेळी महाविकास आघाडी शिरूर लोकसभेचे अधिकृत उमेदवार डॉ.अमोल कोल्हे,मेहबूब शेख,आपचे मयूर दौंडकर,काँग्रेसचे शिवराज मोरे,युवासेनेचे विशाल ससाणे या प्रमुख मान्यवरांनी उपस्थित युवकांना मार्गदर्शन केले.

अमोल कोल्हे म्हणाले की, २०२४ निवडणुकीचा इतिहास लिहिला जाईल तेव्हा महाराष्ट्रातील युवक संविधान वाचवायच्या लढाईमध्ये आघाडीवर होता असा इतिहास लिहिला जाईल.केंद्रातील जुलमी सत्ता बदलण्यासाठी इथला युवक नक्कीच माझी साथ देईल असेही ते म्हणाले.

### युवकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम

» युवक शहराध्यक्ष इम्रान शेख म्हणाले गेल्या दहा वर्षात दोन कोटी रोजगार देण्याचे आश्वासन देऊन युवकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम या मोदी सरकारने केल असून युवकांचे मूळ प्रश्नावरील लक्ष विचलित करण्यासाठी युवकांना धार्मिक मुद्यांवर अडकवले जात असल्याची टीका यावेळी केली.२०१३ पूर्वी ५.४ असलेला बेरोजगारी दर २०२४ मध्ये ८.४ झाला असून याला सर्वस्वी भाजप सरकारचे बेलगाम धोरण कारणीभूत असल्याचे ते म्हणाले.मेळाव्यास महाविकास आघाडचे शिरूर लोकसभेचे अधिकृत प्रदेश उपाध्यक्ष शिवराज मोरे, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी,आप पक्षाचे महासचिव वैजनाथ शिरसाट,आप चे संघटन मंत्री वाजीद शेख, राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे ग्रामीण अध्यक्ष स्वप्नील गायकवाड, पुणे अध्यक्ष किशोर कांबळे, पिंपरी चिंचवड अध्यक्ष इम्रान शेख आदी उपस्थित होते.

# भीतीने सोनिया गांधी राज्यसभेवर!

## मोदींना फक्त श्रीमंतांची चिंता; राहुल गांधी यांचा आरोप

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**जे लोक निवडणुका जिंकू शकत नाहीत, ते 'मैदानातून पळून गेले असून', राजस्थानमधून राज्यसभेवर आले आहेत, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी यांच्यावर टीका केली. देश काँग्रेसला त्याच्या 'पापांसाठी' शिक्षा करत असून, एके काळी चारशे जागा जिंकणाऱ्या या पक्षाला यावेळच्या लोकसभा निवडणुकीत तीनशे जागांवर लढण्यासाठी उमेदवार शोधणे कठीण झाले आहे, असे राजस्थानमधील जालोर येथे निवडणूक प्रचार सभेत बोलताना मोदी म्हणाले.**



जे लोक निवडणूक लढवू शकत नाहीत, निवडणूक जिंकू शकत नाहीत, ते मैदानातून पळून गेले आहेत. या वेळी ते राजस्थानमधून राज्यसभेवर आले आहेत. काँग्रेसची परिस्थिती इतकी वाईट आहे', असे मोदी यांनी सांगितले. मतदानाच्या पहिल्या टप्प्यात निम्म्या राजस्थानने काँग्रेसला दंड केला आहे. काँग्रेस कधीही देशाला मजबूत बनवू शकत नाही हे देशभक्तीने युक्त असलेल्या राजस्थानला ठाऊक आहे', असे मोदी म्हणाले. २०१४ पूर्वी अस्तित्वात असलेली परिस्थिती परत यावी असे देशाला वाटत नाही, असेही त्यांनी नमूद केले. काँग्रेसने भाईभतिजावाद आणि भ्रष्टाचार यांची वाळवी पसरवून देशाला पोकळ करून टाकले आहे, असा आरोपही त्यांनी केला. भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि काही ठरावीक अब्जाधीश देशाच्या लोकशाहीला तसेच घटनेला धोका निर्माण करत आहेत असा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आहे. बिहारमधील भागलपूर येथील सभेत केंद्र सरकारवर टीका केली. देशातील २२ व्यक्तींकडे संपत्तीचे केंद्रीकरण झाले असून, देशातील ७० कोटी लोकांना दिवसाला शंभर रुपयांवर गुजराण करावी लागते असा दावा राहुल यांनी केला. मोदी सरकारने २५ जणांची १६ लाख कोटींची कर्जे माफ केली असा आरोप राहुल यांनी केला.शेतकऱ्यांचे कधी कर्जे माफ केले आहे काय? असा सवाल राहुल यांनी केला. संपत्तीचे गरिबांना योग्य वाटप व्हावे यासाठी इंडिया आघाडी कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले. पंतप्रधान मूळ मुद्द्यावरून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही राहुल यांनी केला. सत्तेत आल्यावर बेरोजगारीची समस्या काँग्रेस सोडवेल असे आश्वासन त्यांनी दिले. जे लोक निवडणूक लढवू शकत नाहीत, निवडणूक जिंकू शकत नाहीत, ते मैदानातून पळून गेले आहेत. या वेळी ते राजस्थानमधून राज्यसभेवर आले आहेत. काँग्रेसची परिस्थिती इतकी वाईट आहे', असे मोदी यांनी सांगितले. मतदानाच्या पहिल्या टप्प्यात निम्म्या राजस्थानने काँग्रेसला दंड केला आहे. काँग्रेस कधीही देशाला मजबूत बनवू शकत नाही हे देशभक्तीने युक्त असलेल्या राजस्थानला ठाऊक आहे', असे मोदी म्हणाले. २०१४ पूर्वी अस्तित्वात असलेली परिस्थिती परत यावी असे देशाला वाटत नाही, काँग्रेसने भाईभतिजावाद आणि भ्रष्टाचार यांची वाळवी पसरवून देशाला पोकळ करून टाकले आहे, असा आरोपही त्यांनी केला.भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि काही ठरावीक अब्जाधीश देशाच्या लोकशाहीला तसेच धोका निर्माण करत आहेत असा आरोप काँग्रेस नेते गांधी यांनी केला आहे.

### बेरोजगारीची समस्या काँग्रेस सोडवेल

» निवडणूक रोख्यांच्या मुद्द्यांवर राहुल गांधी यांनी नरेंद्र मोदी यांच्यावर समाजमाध्यमातून टीका केली. मोदी हे भ्रष्टाचाराची शाळा चालवत असून, भ्रष्टाचार विज्ञानाचे धडे देत आहेत असा टोला राहुल यांनी लगावला. त्यांच्याकडे धुलाई यंत्र असून, केंद्रीय संस्थांचे रूपांतर वसुली एजंटांमध्ये करण्यात आले असून, जामीन तसेच तुरुंगवासाचा खेळ यातून खेळला जातो असा आरोप त्यांनी केला.बिहारमधील भागलपूर येथील सभेत केंद्र सरकारवर टीका केली. देशातील २२ व्यक्तींकडे संपत्तीचे केंद्रीकरण झाले असून, देशातील ७० कोटी लोकांना दिवसाला शंभर रुपयांवर गुजराण करावी लागते असा दावा राहुल यांनी केला. मोदी सरकारने २५ जणांची १६ लाख कोटींची कर्जे माफ केली असा आरोप राहुल यांनी केला.शेतकऱ्यांचे कधी कर्जे माफ केले आहे काय? असा सवाल राहुल यांनी केला. संपत्तीचे गरिबांना योग्य वाटप व्हावे यासाठी इंडिया आघाडी कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले. पंतप्रधान मूळ मुद्द्यावरून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही राहुल यांनी केला. सत्तेत आल्यावर बेरोजगारीची समस्या काँग्रेस सोडवेल असे आश्वासन त्यांनी दिले.

# महाराष्ट्रातील अनेक भागात पार ४० अंशांच्या पुढे

## उष्माघाताची बातमी देताना दूरदर्शनची अँकर स्टुडिओतच कोसळली

। नागपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्रासह देशभरात गेल्या काही दिवसांपासून उन्हाचा तडाखा वाढला आहे. त्यामुळे उष्माघात बाधित रुग्णा च्यासंख्येत वाढ झाली आहे १ मार्च ते १२ एप्रिल या ४२ दिवसांत महाराष्ट्रात उष्माघाताने बाधित ७७ रुग्ण आढळले आहेत.**



३६ रुग्ण ८ ते १२ एप्रिल या पाच दिवसांत आढळले आहेत. दिल्ली, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगालसह उत्तरेकडील अनेक राज्यांमध्ये तापमानाचा पारा ३५ अंशांच्या पुढे सरकला आहे. पश्चिम बंगालमध्ये शनिवारी उष्णतेची लाट आल्याचं पाहायला मिळालं. दरम्यान, डीडी बांगलाच्या (दूरदर्शन बंगाल) अँकर (वृत्तनिवेदक) लोपामुद्रा सिन्हा बातम्या वाचत असताना बेशुद्ध झाल्या. उष्माघाताची बातमी वाचत असतानाच त्यांना भोवळ आली. लोपामुद्रा बातम्या वाचत असताना बेशुद्ध झाल्याचा व्हिडीओ सध्या समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे. त्यानंतर लोपामुद्रा यांनी स्वतः फेसबूकवर लाईव्ह येऊन शनिवारी दूरदर्शनच्या स्टुडिओत नेमकं काय झालं याबाबत माहिती दिली आहे.फार मोठ्या जबाबदाऱ्यांमुळे भारत भेट लांबणीवर पडली आहे. लोपामुद्रा सिन्हा यांनी त्यांच्या फेसबूक पोस्टमध्ये म्हटलं आहे की, लाईव्ह बातम्या वाचत असताना माझा रक्तदाब (बीपी) कमी झाला होता त्यामुळे मी बेशुद्ध झाले. गेल्या काही दिवसांपासून माझी तब्येत फार बरी नाहीये. त्या दिवशीदेखील मला बरं वाटत नव्हतं. मात्र मला वाटलं थोडं पाणी प्यायल्यावर बरं वाटेल. मी कधीच स्टुडिओत पाणी घेऊन जात नाही.

### नेमकं काय झालं होतं?

» १० मिनिटांसाठी मी स्टुडिओत जाऊन बातम्या वाचणार असेन, अथवा अर्ध्या तासासाठी, मी कधीच पाणी घेऊन जात नाही. त्या दिवशी मी स्टुडिओमधील व्यवस्थापकाला इशारा करून पाणी आणून देण्यास सांगितलं. लोपामुद्रा सिन्हा म्हणाल्या, माझ्या डोळ्यासमोर अंधारी येत होती तेव्हा मी पाहिलं की, चार बातम्या बाकी आहेत. मला वाटलं या चार बातम्या मी पूर्ण करू शकेन. त्यातल्या दोन बातम्या मी कशाबशा वाचल्या. त्यानंतर तिसरी बातमी उष्माघाताशी संबंधित होती. ती बातमी वाचताना मला हळूहळू भोवळ येऊ लागली. त्यावेळी मी स्वतःला सावरण्याचा प्रयत्न केला. मी ही बातमीदेखील पूर्ण करेन असं मला वाटलेलं. तेवढ्यात मला दिसणं बंद झालं. माझ्या डोळ्यांसमोर काळाकुट्ट अंधार होता. मला टेलिप्रॉम्प्टर दिसतच नव्हता. माझ्यासमोरचं दृष्य हळूहळू पुसट होत गेलं. सुरुवातीला वाटलेलं की, टेलिप्रॉम्प्टर थिम्या गतीने चालतोय. मात्र मलाच दिसेनासं झालं होतं.

# रितेश देशमुख यांनी जिनिलीयासह घेतलं रामलल्लाचं दर्शन

मनोरंजनसृष्टीमधील आदर्श जोडपं म्हणून रितेश-जिनिलीयाकडे पाहिलं जातं. त्यांनी मराठीसह बॉलीवूड कलाविश्वात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. म्हणूनच महाराष्ट्रात त्यांना दादा-वहिनी असं संबोधलं जातं. रितेश देशमुख व त्याच्या कुटुंबीयांचं सोशल मीडियावर नेहमीच कौतुक होत असतं. आता अभिनेता नुकताच त्याच्या पत्नी व मुलांसह अयोध्येत पोहोचला आहे. जानेवारी महिन्यात अयोध्येतील राम मंदिराचा भव्य उद्घाटन सोहळा पार पडला होता. यावेळी रितेश-जिनिलीया हजर राहिले नव्हते. त्यामुळे आता ही जोडी आपल्या दोन्ही मुलांसह रामलल्लाचं दर्शन घेण्यासाठी अयोध्येला पोहोचली आहे. दर्शन घेतानाचा फोटो रितेशने सोशल मीडियावर शेअर केला आहे.मंत्रो से बढके तेरा ना...जय श्री राम! आज तुझं दर्शन घेता आलं आम्ही धन्य झालो #राममंदिरअयोध्या" असं कॅप्शन रितेश देशमुखने या फोटोला दिलं आहे. अभिनेत्याने शेअर केलेल्या या फोटोवर नेटकरी कौतुकाचा वर्षाव करत आहेत. अयोध्येला जाऊन परंपरा, संस्कृती जपल्याने या जोडीचं कौतुक करण्यात येत आहे.दरम्यान, रितेश-जिनिलीया सोशल मीडियावर कायम सक्रिय असतात.



आपल्या आयुष्यातील प्रत्येक अपडेट ते चाहत्यांबरोबर शेअर करत असतात. दोघांच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर जिनिलीया लवकरच आमिर खानच्या आगामी चित्रपटात प्रमुख भूमिका साकारणार आहे. तर, रितेश सध्या 'हाऊसफुल्ल ५' च्या शूटिंगमध्ये व्यग्र आहे.

मनोरंजनसृष्टीमधील आदर्श जोडपं म्हणून रितेश-जिनिलीयाकडे पाहिलं जातं. त्यांनी मराठीसह बॉलीवूड कलाविश्वात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. म्हणूनच महाराष्ट्रात त्यांना दादा-वहिनी असं संबोधलं जातं. रितेश देशमुख व त्याच्या कुटुंबीयांचं सोशल मीडियावर नेहमीच कौतुक होत असतं. आता अभिनेता नुकताच त्याच्या पत्नी व मुलांसह अयोध्येत पोहोचला आहे. जानेवारी महिन्यात अयोध्येतील राम मंदिराचा भव्य उद्घाटन सोहळा पार पडला होता. यावेळी रितेश-जिनिलीया हजर राहिले नव्हते.

## पंकज त्रिपाठींच्या भावोजींचा मृत्यू

बॉलीवूड अभिनेते पंकज त्रिपाठी यांच्या घरातून एक दु:खद बातमी समोर येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पंकज त्रिपाठी यांच्या बहिणीचे पती म्हणजेच त्यांच्या भावोजींचा शनिवारी रस्ते अपघातात मृत्यू झाला आहे. तसेच त्यांची बहीण सबिता तिवारी यांची प्रकृती देखील चिंताजनक असल्याचं सांगण्यात येत आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दिल्ली-कोलकाता राष्ट्रीय महामार्ग – २ वर निरसा बाजार येथे दुपारी ४.३० च्या सुमारास हा अपघात झाला. हे जोडपं प्रवास करत असलेल्या कारने रस्ता दुभाजकाला धडक दिली. राकेश व सबिता बिहारच्या गोपालगंज जिल्ह्यातून पश्चिम बंगालकडे धनबाद वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आलं. परंतु, राकेश यांची प्रकृती आधीच गंभीर असल्याने रुग्णालयात नेताच त्यांना मृत घोषित करण्यात आलं.

## मिनिटासाठी 1 कोटी मानधन

बॉलीवूड सिनेसृष्टीत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणाऱ्या अनेक अभिनेत्री आहेत. आलिया भट्ट, दीपिका पदुकोण, प्रियांका चोप्रा अशा आघाडीच्या अभिनेत्रींना मागे टाकत एक अभिनेत्री अशी आहे; जी त्यांच्यापेक्षा जास्त मानधन घेते. मॉडेल व अभिनेत्री उर्वशी रौतेला एका मिनिटासाठी चक्क एक कोटी रुपये मानधन आकारते. 'डीएनए इंडिया'ने दिलेल्या माहितीनुसार, उर्वशी रौतेलाने तीन मिनिटांच्या गाण्यासाठी चक्क एक कोटी रुपयांचं मानधन स्वीकारलं होतं. या अभिनेत्रीनं 'स्कंद' चित्रपटात 'कल्ट मामा' गाण्यावर डान्स केला. या तीन मिनिटांच्या गाण्यासाठी उर्वशीनं चक्क तीन कोटींचं मानधन घेतलं होतं. म्हणजेच एका मिनिटासाठी उर्वशीनं एक कोटी रुपये मानधन घेतलं. त्यामुळे एका मिनिटासाठी एक कोटी मानधन घेणारी ती भारतातली पहिलीच अभिनेत्री ठरली.याआधी उर्वशी रौतेलानं चिरंजीवी अभिनीत 'वॉल्टेअर वीरैया'मधील गाण्यासाठी दोन कोटी रुपये मानधन घेतलं होतं. उर्वशी रौतेलाचे इन्स्टाग्रामवर ७१ दशलक्षांहून अधिक फॉलोअर्स आहेत आणि तिची एकूण संपत्ती ५५० कोटींहून अधिक असल्याचा अंदाज आहे. उर्वशी रौतेला 'फोर्ब्स'च्या टॉप १० मध्ये समाविष्ट होणारी सर्वांत तरुण भारतीयदेखील आहे.आता ही अभिनेत्री एका ६३ वर्षीय साऊथ सुपरस्टारबरोबर काम करण्यासाठी सज्ज झाली आहे. उर्वशी सध्या नंदामुरी बालकृष्णा यांच्यासह तिच्या 'एन बी के-१०९' या आगामी चित्रपटाची तयारी करीत आहे. चित्रपटातील ॲक्शन सीक्वेन्ससाठी तिला एम एम के आयकॉन कोनोर मॅकग्रेगरकडून प्रशिक्षण दिले जात आहे



## घरावरील हल्ल्यानंतर सलमान खान दुबईत,

मुंबईतील वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटमधील घरावर झालेल्या गोळीबारानंतर पहिल्यांदाच सलमान खान दुबईला गेला आहे. एका कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी भाईजान दुबईत आहे. तो सहभागी झालेल्या कार्यक्रमातील अनेक फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. सलमान खान एका लक्झरी प्रोजेक्टच्या उद्घाटनासाठी दुबईला गेला आहे. या कार्यक्रमात अभिनेत्री एलनाझ नौरोजीचा खास डान्स परफॉर्मन्स झाला. हा डान्स पाहतानाचा सलमानचा एक व्हिडीओ चर्चेत आहे. याच कार्यक्रमातील दुसऱ्या एका व्हिडीओत सलमान खान आयोजक रिझवान साजन यांच्यासह बसलेला दिसतोय. तिथे अचानक शाहरुख खानच्या 'पठाण' सिनेमातील 'बेशरम रंग' गाणं वाजू लागतं. सलमान खान या गाण्यावर स्टेजवर होणारा परफॉर्मन्स लक्षपूर्वक बघताना दिसतोय.दरम्यान, १४ एप्रिल रोजी घरावर गोळीबार झाल्यानंतर सलमान खान पाच दिवस घरीच होता. १९ एप्रिलला तो सुरक्षा रक्षकांसह मुंबई विमानतळावरून दुबईला रवाना झाला. भाईजान या कार्यक्रमासाठी काही दिवस दुबईत असेल असं म्हटलं जातंय.मुंबईतील वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटमधील घरावर झालेल्या गोळीबारानंतर पहिल्यांदाच सलमान खान दुबईला गेला आहे. एका कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी भाईजान दुबईत आहे. तो सहभागी झालेल्या कार्यक्रमातील अनेक फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.डान्स परफॉर्मन्स झाला. हा डान्स पाहतानाचा सलमानचा एक व्हिडीओ चर्चेत आहे.याच कार्यक्रमातील दुसऱ्या एका व्हिडीओत सलमान खान आयोजक रिझवान साजन यांच्यासह बसलेला दिसतोय. तिथे अचानक शाहरुख खानच्या 'पठाण' सिनेमातील 'बेशरम रंग' गाणं वाजू लागतं. सलमान खान या गाण्यावर स्टेजवर होणारा परफॉर्मन्स लक्षपूर्वक बघताना दिसतोय.

## राजकुमार रावने प्लास्टिक सर्जरी केलीये?



आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारा बॉलीवूड अभिनेता राजकुमार राव दिलजीत दोसांझच्या कॉन्सर्टमध्ये दिसल्यापासून चर्चेत आहे. या कॉन्सर्टमध्ये अभिनेता नेहमीपेक्षा थोडा वेगळा दिसत होता. दरम्यान, या कॉन्सर्टमधील राजकुमारचे पापाराझींनी काढलेले फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आणि राजकुमारने प्लास्टिक सर्जरी केल्याच्या चर्चांना उधाण आलं. त्यावर आता राजकुमारनं मौन सोडलं आहे. नुकत्याच 'बॉलीवूड हंगामा'ला दिलेल्या मुलाखतीत राजकुमार राव म्हणाला, "मी कोणतीही प्लास्टिक सर्जरी केली नाही आहे. व्हायरल झालेला फोटो फक्त एक वाईट फोटो होता,असं आपण म्हणू शकतो. त्या फोटोला टच-अप्स केले आहेत. मला खूपदा वाटतं की, माझी त्वचा अशी नितळ आणि चमकदार असती, तर किती चांगलं झालं असतं. कारण- त्या फोटोत मी तसाच दिसत होतो. मी तेव्हा कोणताच मेकअप केला नव्हता; पण मलाही वाटलं की, तो फोटो खूप विचित्र दिसत होता. कॅमेऱ्यात कैद झालेला तो एक वाईट क्षण होता. मी कोणतीही प्लास्टिक सर्जरी केलेली नाही."आठ वर्षांअगोदर मी हनुवटीसाठी काही फिलर वर्क केलेलं. कारण- मला आत्मविश्वास असल्यासारख दिसायचं होतं. तेव्हा माझ्या त्वचाशास्त्रज्ञानं मला सल्ला दिला होता आणि मी त्याप्रमाणे केलं. त्यानंतर माझा आत्मविश्वास वाढला का? तर हो. त्यानंतर मी आणखी चांगले चित्रपट केले आहेत आणि त्यामुळे माझा दृष्टिकोन बदलला आहे. अभिनय हे दृश्य माध्यम आहे. माझा याला विरोध नाही. जर एखाद्याला त्याचा आत्मविश्वास वाढवायचा असेल आणि विज्ञान उपलब्ध

# आता वजन राखण्याचे आव्हान : फोगट!

## कठोर मेहनत घेऊन मी वजन 50 किलोपर्यंत खाली आणले

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**अडथळयांची आव्हाने पार करून ऑलिम्पिक कोटा मिळविल्याचा विनेश फोगट निश्चित आनंदी असेल, पण आता आराम करून चालणार नाही. ऑलिम्पिकपर्यंत पुढील चार महिने मला वजन राखण्याची कसरत करावी लागेल, असे मत विनेशने व्यक्त केले. विनेशने वैयक्तिक आयुष्यातील संकटांवर मात देत सलग तिसऱ्यांदा ऑलिम्पिक कोटा मिळवला. कुस्ती महासंघाच्या विरोधात शड्डू ठोकल्यानंतर जवळपास दीड वर्षे ती मॅट सरावापासूनही दूर राहिली होती. अशात तिच्या नेहमीच्या ५३ किलो वजनी गटातून अंतिम पंघालने ऑलिम्पिक कोटा मिळवला. त्यामुळे सलग तिसऱ्यांदा ऑलिम्पिक खेळण्याच्या उद्देशाने पेटून उठललेल्या विनेशने वजनी गट बदलून ५० किलोमधून खेळण्याचा निर्णय घेतला.**



यातही पहिला अडथळा पार करताना विनेशने आशियाई ऑलिम्पिक पात्रता फेरीत आपले निर्विवाद वर्चस्व राखले. विनेश म्हणाली,“ हे सारे अद्भुत आहे. मी कमालीची आनंदी आणि अधिक चांगल्या कामगिरीसाठी प्रेरित झाली आहे.

कठोर मेहनत घेऊन मी वजन ५० किलोपर्यंत खाली आणले आहे. आता पुढील चार महिने ते टिकवून ठेवण्याचे मुख्य आव्हान मला पेलावे लागणार आहे.माझ्या शरीरातील पेशी झपाटयाने वाढतात. मी तंदुरुस्त दिसत असले, तरी माझ्याकडे पिळदार स्नायू असल्यामुळे वजन पटकन वाढते. मॅटवरील सरावाची मला चिंता नाही. माझ्याकडे फक्त चार महिने आहेत आणि काही करून मला वजन नियंत्रित करायचे आहे,” असेही विनेशने जागतिक कुस्ती महासंघाच्या संकेतस्थळाला दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे. “ऑलिम्पिक संघ निवडताना आता भारतीय कुस्ती महासंघाच्या वतीने पुन्हा चाचणी घेण्यात येणार आहे. मी देशासाठी ५० किलो वजनी गटात कोटा मिळविल्याचा मला आनंद आहे. आता मी ५० किलो की ५३ किलो वजनी गटातून ऑलिम्पिकमध्ये खेळणार हे संघ निवड चाचणीतून निश्चित होईल,” असेही विनेश म्हणाली. अडथळयांची आव्हाने पार करून ऑलिम्पिक कोटा मिळविल्याचा विनेश फोगट निश्चित आनंदी असेल,

पण आता आराम करून चालणार नाही. ऑलिम्पिकपर्यंत पुढील चार महिने मला वजन राखण्याची कसरत करावी लागेल, असे मत विनेशने व्यक्त केले. विनेशने वैयक्तिक आयुष्यातील संकटांवर मात देत सलग तिसऱ्यांदा ऑलिम्पिक कोटा मिळवला. कुस्ती महासंघाच्या विरोधात शड्डू ठोकल्यानंतर जवळपास दीड वर्षे ती मॅट सरावापासूनही दूर राहिली होती. अशात तिच्या नेहमीच्या ५३ किलो वजनी गटातून अंतिम पंघालने ऑलिम्पिक कोटा मिळवला. त्यामुळे सलग तिसऱ्यांदा ऑलिम्पिक खेळण्याच्या उद्देशाने पेटून उठललेल्या विनेशने वजनी गट बदलून ५० किलोमधून खेळण्याचा निर्णय घेतला. यातही पहिला अडथळा पार करताना विनेशने आशियाई ऑलिम्पिक पात्रता फेरीत आपले निर्विवाद वर्चस्व राखले. विनेश म्हणाली,“ हे सारे अद्भुत आहे. मी कमालीची आनंदी आणि अधिक चांगल्या कामगिरीसाठी प्रेरित झाली आहे. कठोर मेहनत घेऊन मी वजन ५० किलोपर्यंत खाली आणले आहे. आता पुढील चार महिने ते टिकवून ठेवण्याचे मुख्य आव्हान मला पेलावे लागणार आहे.माझ्या शरीरातील पेशी झपाटयाने वाढतात. मी तंदुरुस्त दिसत असले, तरी माझ्याकडे पिळदार स्नायू असल्यामुळे वजन पटकन वाढते. मॅटवरील सरावाची मला चिंता नाही. माझ्याकडे फक्त चार महिने आहेत आणि काही करून मला वजन नियंत्रित करायचे आहे,

### 53 किलो वजनी गटातून खेळणार

असेही विनेशने जागतिक कुस्ती महासंघाच्या संकेतस्थळाला दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे. “ऑलिम्पिक संघ निवडताना आता भारतीय कुस्ती महासंघाच्या वतीने पुन्हा चाचणी घेण्यात येणार आहे. मी देशासाठी ५० किलो वजनी गटात कोटा मिळविल्याचा मला आनंद आहे. आता मी ५० किलो की ५३ किलो वजनी गटातून ऑलिम्पिकमध्ये खेळणार हे संघ निवड चाचणीतून निश्चित होईल,” असेही विनेश म्हणाली.अडथळयांची आव्हाने पार करून ऑलिम्पिक कोटा मिळविल्याचा विनेश फोगट निश्चित आनंदी असेल, पण आता आराम करून चालणार नाही. ऑलिम्पिकपर्यंत पुढील चार महिने मला वजन राखण्याची कसरत करावी लागेल, असे मत विनेशने व्यक्त केले.

# गुजरातचा पंजाब किंग्जवर ३ विकेट्सनी विजय

## गुजरातच्या राहुल तेवतिया-साई किशोरचे शानदार प्रदर्शन

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**आयपीएल २०२४ मधील ३७ वा सामना पंजाब किंग्ज आणि गुजरात टायटन्स यांच्यात खेळला गेला.महाराजा यादविंदर सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, मुल्लानपूर येथे झालेल्या सामन्यात गुजरातने पंजाबचा ३ विकेट्सनी पराभव केला. त्याचबरोबर यंदाच्या हंगामातील आपला चौथा विजय नोंदवला. पंजाब किंग्जने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना १४३ धावांचे लक्ष्य दिले होते, जे गुजरात टायटन्सने शेवटच्या षटकातील पहिल्या चेंडूवर १४७ धावा करत विजयावर शिक्कामोर्तब केला. गुजरातसाठी राहुल तेवतीयाने १८ चेंडूत नाबाद ३६ धावा करत विजयात सर्वाधिक धावांचे योगदान दिले.**






या विजयासह गुजरात टायटन्सने पंजाब किंग्जविरुद्धच्या मागील सामन्यातील पराभवाचा बदला घेतला. त्याचबरोबर आता त्यांत्या खात्यात ८ गुण झाले असून सहाव्या स्थानावर आहे. त्याचबरोबर पंजाब किंग्जची चार गुणांसह नवव्या स्थानावर घसरण झाली आहे. गुजरातच्या या विजयात राहुल तेवतियाचे महत्त्वाचे योगदान होते. त्याने ३६ धावांची नाबाद खेळी खेळली. त्याने या खेळी दरम्यान १८ चेंडूचा सामना करताना ७ चौकार मारले. पंजाबने दिलेल्या १४३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातची सुरुवात चांगली झाली होती. साहा आणि गिल यांच्यात पहिल्या विकेटसाठी २५ धावांची भागीदारी झाली. अर्शदीप सिंगने संघाला पहिला धक्का दिला. त्याने साहाला बाद केले. तो १३ धावा करण्यात यशस्वी झाला. तर गिल ३५ धावा करून परतला. या सामन्यात साई सुदर्शनने ३१ धावा केल्या. तर डेव्हिड मिलर चार धावा, अजमतुल्ला उमरझाई १३ धावा आणि शाहरुख खान तीन धावा करून बाद झाला. साई किशोर खाते न उघडता नाबाद राहिला. पंजाबकडून हर्षल पटेलने तीन तर लियाम लिव्हिंगस्टोनने दोन गडी बाद केले. त्याचवेळी अर्शदीप सिंग आणि सॅम करन यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.गुजरात टायटन्स संघ अडचणीत आला होता, त्यावेळी सहाव्या क्रमांकावर राहुल तेवतिया फलंदाजीला आला. त्याने सुरुवातीला संयमाने फलंदाजी केली आणि डावाच्या १८ व्या षटकात ३ चौकार आणि एका षटकारासह २० धावा करून सामना आपल्या बाजून वळवला. तेवतियाने कठीण परिस्थितीत १८ चेंडूत ३६ धावांची तुफानी खेळी करत गुजरात टायटन्सचा ३ गडी राखून आयपीएल २०२४ मधील ३७ वा सामना पंजाब किंग्ज आणि गुजरात टायटन्स यांच्यात खेळला गेला.

### टायटन्सने चौथा विजय नोंदवला

महाराजा यादविंदर सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, मुल्लानपूर येथे झालेल्या सामन्यात गुजरातने पंजाबचा ३ विकेट्सनी पराभव केला. त्याचबरोबर यंदाच्या हंगामातील आपला चौथा विजय नोंदवला. पंजाब किंग्जने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना १४३ धावांचे लक्ष्य दिले होते, जे गुजरात टायटन्सने शेवटच्या षटकातील पहिल्या चेंडूवर १४७ धावा करत विजयावर शिक्कामोर्तब केला.